# १२. भरतवाक्य

**मोरोपंत** (१७२९ ते १७९४) :

पंडित कवी. काव्य-नाटक-व्याकरण-अलंकारादी शिकून न्याय व वेदान्त यांचे अध्ययन. त्यांनी विपुल काव्यरचना केली आहे. २६८ काव्यकृती त्यांच्या नावावर आहेत. त्यांपैकी 'आर्याभारत', 'केकावलि', 'मंत्रभागवत', 'मंत्ररामायण', 'श्रीकृष्णविजय' व 'हरिवंश' या रचना प्रसिद्ध आहेत. त्यांनी संस्कृत काव्यरचनाही केली आहे. त्यांचे समग्र वाङ्मय 'कवीवर्य मोरापंतांचे समग्र ग्रंथ : खंड १ ते १२' यामध्ये संग्रहित करण्यात आले आहे.

मोरोपंतांनी या रचनेत सज्जन माणसांच्या सहवासाचे व सद्विचारांच्या श्रवणाचे महत्त्व यांकडे लक्ष वेधले आहे. खोटा अभिमान बाळगू नये, भक्तिमार्गाकडे वळताना कोणत्याही मोहाला बळी पडू नये असे आवाहन केले आहे. सत्कर्मात व सज्जनांच्या सहवासात राहण्याची शिकवण या पद्य रचनेतून दिली आहे.

सुसंगति सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;
कलंक मतिचा झडो; विषय सर्वथा नावडो;
सदंघ्रिकमळीं दडो; मुरडितां हटानें अडो;
वियोग घडतां रडो; मन भवच्चरित्रीं जडो ।।


न निश्चय कधीं ढळो; कुजनविघ्नबाधा टळो;
न चित्त भजनीं चळो; मति सदुक्तमार्गीं वळो; ।
स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;
पुन्हां न मन हें मळो; दुरित आत्मबोधें जळो ।।

मुखीं हरि! वसो तुझी कुशलधामनामावली,
क्षणांत पुरवील जी सकलकामना मावली; ।
कृपा करिशि तूं जगत्रयनिवास दासावरी,
तशी प्रगट हे निजाश्रितजनां सदा सांवरी ।।

(केकावलि)

**(१) आकृती पूर्ण करा.**

(अ)




(आ)




**(२) योग्य पर्याय निवडून विधान पुन्हा लिहा.**

(अ) कवींच्या मते मनातील सर्व इच्छा पूर्ण व्हाव्यात म्हणून ——————

(१) सतत परमेश्वराच्या सान्निध्यात राहावे.

(२) सतत परमेश्वराचे नामस्मरण करावे.

(३) सतत आत्मबोध घ्यावा.

(४) चारधाम यात्रा करावी.

(आ) सदंघ्रिकमळीं दडो; म्हणजे ——————

(१) कमळाच्या फुलात चित्त सदैव गुंतो.

(२) कमळातून मधुसेवन करणाऱ्या भुंग्याप्रमाणे सज्जनांच्या पायाशी मन गुंतो.

(३) कमळाच्या व भ्रमराच्या सौंदर्यात मन गुंतो.

(४) कमळात मन लपून राहो.

**(३) खालील गोष्टींच्या बाबतीत कवी परमेश्वराजवळ कोणती विनंती करतात ते लिहा.**

| गोष्टी | विनंती |
|---|---|
| (१) निश्चय | |
| (२) चित्त | |
| (३) दुरभिमान | |
| (४) मन | |

**(४) खालील ओळींचा तुम्हांला समजलेला अर्थ लिहा.**

(१) मति सदुक्तमार्गीं वळो ——————

(२) न निश्चय कधीं ढळो ——————

**(५) काव्यसौंदर्य.**

(अ) 'सुसंगती सदा घडो; सुजनवाक्य कानीं पडो;' या ओळींचे रसग्रहण करा.

(आ) 'स्वतत्त्व हृदया कळो; दुरभिमान सारा गळो;' या काव्यपंक्तीतील विचारसौंदर्य स्पष्ट करा.

(इ) सत्प्रवृत्त व्यक्तीची तुम्हांला जाणवलेली वैशिष्ट्ये तुमच्या शब्दांत लिहा.

(ई) वाईट गोष्टींचा मोह टाळण्यासाठी तुम्ही कोणते उपाय सुचवाल ते लिहा.

(टिपा – • सदंघ्रिकमळीं – सत् + अंघ्रि + कमळी. अंघ्रि–पाय. सज्जनांच्या पदकमलाच्या ठिकाणी.

• भरतवाक्य– नाटकातील शेवटचे वाक्य. इथे, 'केकावलि' ग्रंथाच्या उपसंहारातील शेवटची पद्यरचना.)

DBZVHR